# मेट्रो-३ घेणार मॅस्कॉट, जिंगल स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्यावतीने मुंबई मेट्रो मार्ग-३ साठी मॅस्कॉट आणि जिंगल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली असून १ ते ३० जून या कालावधीत www.mmrcl.com या संकेतस्थळावर स्पर्धक प्रवेशिका दाखल करू शकतील.

दोन्ही स्पर्धांच्या प्रवेशिका संकेतस्थळाद्वारेच स्वीकारल्या जातील. इच्छुक स्पर्धकांना त्यांचे नाव, संपर्क तपशील आणि नोंदी संकेतस्थळावर नमूद करता येणार आहे. स्पर्धेसंबंधित तपशीलवार नियमावली संकेतस्थळावर उपलब्ध आहे. दोन्ही स्पर्धेचे निकाल सोशल मीडिया हँडल तसेच संकेतस्थळावर जाहीर केले जातील.